माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२७/२०२२**

**अपिलार्थी :- श्री.संतोष मारोतीराव गावंडे,**
**मु.पो.कळशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती.**

**विरुध्द**

**उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत कळशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
**पंचायत समिती, दर्यापूर, जि.अमरावती.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०९.२०२५**

**अपिलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या पत्राचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०८.२०२१ | ०९.११.२०२१ | १२.१०.२०२१ | २६.१०.२०२१ |

१. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये **दि.१०.०१.२०२२** रोजी **जोडपत्र-क** या नमुन्यात आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दाखल केला. सदर अपील दाखल करण्याच्या प्रयोजनामध्ये *"प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ७ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्णय देवून सुध्दा माहिती प्राप्त न झाल्याने"*, असे नमूद केले आहे.

२. सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री.डी.एल.टोळे, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, हयापूर, ता.अंजनगाव श्री.सी.जे.आजनकर तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, श्री.सी.जे.ढवक व श्रीमती ज्योती अडसोडे उपस्थित आहेत.

३. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार अपिलार्थी यांनी **दि.१०.०८.२०२१** रोजी **जोडपत्र-अ** या नमुन्यात जन माहिती अधिकारी यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन त्यामध्ये *"ग्रामपंचायत कार्यालय कळाशी यांनी अर्जदाराचे घर असतांना गजानन किसन गावंडे यांचे नावे ८-अ केला तो कशाच्या आधारावर केला त्याबाबतची माहिती इतंभुत माहिती संपूर्ण कागदपत्रासह मिळण्याबाबत. सदर्दू जागेची खरेदी आमचे नावे असतांना माझे वडिलांनी किंवा परिवारातील कोणीही लेखी संमती दिली नसतांना सदहू ८-अ अन्य व्यक्तीच्या नावे ग्रामपंचायत यांनी नमुद केला. त्या ठरावाची सत्यप्रत, किसन विटुजी गावंडे यांनी मालकी हक्काची ग्रामपंचायतला दिली असलेली कागदपत्रे, यासह संपूर्ण कागदपत्रे फेरफाराची व इतंभुत माहिती."* इ. माहिती मागितली होती.

४. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार दाखल झालेला अर्ज जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात निकाली काढणे बंधनकारक आहे.

५. मात्र अपिलार्थीला अभिप्रेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दि.१२.१०.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार **जोडपत्र-ब** मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्याच्या कारणामध्ये "*माहिती प्रदान करण्याचा विनिर्दीष्ट कालावधी संपून सुध्दा माहिती अप्राप्त कारण माहिती देवून विलंबाबाबत संबंधितांना शास्ती होणेबाबत*" असे नमूद केले आहे.

६. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.१०.२०२१ रोजी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन, "*अपिलार्थींना ७ दिवसाचे आत निशुल्क माहिती देण्यात यावी*" असे आदेश पारित केले. या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.११.२०२१ रोजी अपिलार्थीस पत्र देऊन "श्री.गजानन किसन गावंडे यांच्या नावे करण्यात आलेल्या फेरफार संबंधित कोणतेही दस्ताऐवज व ठराव ग्रामपंचायतला उपलब्ध नाही" असे कळविले.

७. व्दितीय अपिलाच्या सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले की, अपिलार्थी फेरफाराची प्रत मागत आहे. फेरफार रजिस्टर ग्रामपंचायतला उपलब्ध नाही. तसेच ग्रामपंचायतचा ठराव झाल्याशिवाय फेरफार घेता येत नाही, परंतू ठरावाची प्रत दाखल केली नाही. बिना ठरावाने फेरफार घेतला आहे व तो कसा घेतला हे कुठेच आढळून येत नाही.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर व सुनावणीच्या वेळीचा युक्तिवाद विचारात घेऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## अंतरिम आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीत संबंधित नोंदीचे फेरफार रजिस्टर व ग्रामपंचायत ठरावाची प्रत आयोगासमक्ष सादर करावी.

२. पुढील सुनावणी दि.२५.०९.२०२५ रोजी, दुपारी ०२.०० वाजता ठेवण्यात येते.

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, अमरावती.**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०९.२०२५**

जावक क्रमांक ५८०१ दिनांक 25 SEP 2025



MJG